# MAHARASHTRA ACT No. XXXII OF 1969

## THE MAHARASHTRA STATE LEGISLATURE PROCEEDINGS (PROTECTION OF PUBLICATION) ACT, 1969

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास हंगामी राष्ट्रपती असलेले उपराष्ट्रपती यांची संमती दिनांक ५ जून १९६९ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**बी. पी. दलाल,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XXXII OF 1969

## AN ACT TO PROTECT THE PUBLICATION OF REPORTS OF PROCEEDINGS OF THE MAHARASHTRA STATE LEGISLATURE

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात,** दिनांक १३ जून १९६९ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला.]

## सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२

**महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या कामकाजाच्या प्रतिवृत्तांच्या प्रकाशनाचे संरक्षण करण्यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या कामकाजाच्या प्रतिवृत्ताच्या प्रकाशनाचे संरक्षण करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या विसाव्या वर्षी, तो, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे कामकाज (प्रकाशन संरक्षण) अधिनियम, १९६९ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व व्याप्ति.

(२) तो संबंध महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

२. या अधिनियमात, "वृत्तपत्र" म्हणजे सार्वजनिक बातमी किंवा सार्वजनिक बातमीवरील टीका असणारे कोणतेही मुद्रित नियतकालिक (यात दैनिक वर्तमानपत्राचा समावेश होतो) आणि त्यामध्ये, वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यासाठी साहित्य पुरविणाऱ्या वृत्तसंस्थेचा समावेश होईल. व्याख्या.

विधान-ंडळाच्या कामकाजाच्या ातिवृत्तांचे ाकाशन इत्यादीबाबत ाशषाधिकार.

३. (१) पोट-कलम (२) मध्ये अन्यथा उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त, कोणतीही व्यक्ती, महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या कोणत्याही सभागृहाच्या कोणत्याही कामकाजाचे सारत: सत्य प्रतिवेदन वृत्तपत्रात प्रसिद्ध केल्याबद्दल, ते प्रकाशन विद्वेषपूर्वक केल्याचे सिद्ध करण्यात आले नसेल तर, कोणत्याही, न्यायालयात कोणत्याही दिवाणी किंवा फौजदारी कार्यवाहीस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही मजकुरामुळे, जिचे प्रकाशन लोकहितासाठी नाही अशी कोणतीही बाब प्रसिद्ध करण्यास संरक्षण मिळते असा अर्थ लावता कामा नये.

ानतारी देश व्यवस्थे-ारा ध्वनि-ापित ाणाऱ्या ाधान-डळाच्या ामकाजास द्वा अधि-यम लागू ाणे.

४. हा अधिनियम, वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणारी प्रतिवृत्ते किंवा बाबी यांच्या संबंधात जसा लागू होईल तसाच ध्वनिक्षेपण केंद्राच्या सहाय्याने केलेल्या कोणत्याही कार्यक्रमाचा किंवा सेवेचा भाग म्हणून बिनतारी संदेश व्यवस्थेद्वारा ध्वनिक्षेपित होणारी प्रतिवृत्ते किंवा बाबी, यांना लागू होईल.

(यथार्थ अनुवाद)

वा. ना. पंडित,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य